माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००१३७५**

**अपिलार्थी श्री. रामसेवक मौर्या**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार -२ (विशेष कक्ष)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.०५.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १९.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०१.२०२५ | ११.०३.२०२५ | २८.०२.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ११.०३.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १६.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"Provide the certified copy of list of Managing Committee of Swpnpurti (SRA) Sahakari Ghrah Nirman Sansth."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०३.२०२५ रोजी अपिलार्थीना कळविले की, माहिती अधिकार अर्जात साक्षांकित प्रत पुरवली जात नाही. साक्षांकित प्रतीसाठी आपणांस स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागेल. तरी आपणांस आवश्यक असल्यास नस्ती नरीक्षण करुन आपणांस आवश्यक असलेली कागदपत्रे माहिती अधिकार अर्जाअंतर्गत छायाकिंत प्रतीवर माहिती अधिकारचा शिक्का देऊन माहिती पुरविण्यात येईल.

अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०२.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

५. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क केला असता असे समजले की, सदर कार्यालयात जन माहिती अधिकारी हे पद रिक्त आहे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांनी सदर कार्यालयात जन माहिती अधिकारी यांची तात्काळ नियुक्ती करावी व तसे आयोगास अवगत करावे.

७. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १५.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत: मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई.